# printing® Area

ISSN 2394- 5303

Issue-72, Vol-01 January 2021

Peer Reviewed International Refereed Research Journal





Editor

Dr.Bapu G.Gholap

# INDEX

01) Effects of Yoga on Human Productivity
Dr. Ashok Kumar, Basti (UP) ||14

02) The Flipped Classroom in Various Disciplines of Education
Dr. Renuka D. Badvane(Bhavsar), Jalna ||16

03) The Importance of Sports and the Role of the Institutional Head
Ulhas V. Bramhe, Dist. Buldana ||18

04) Foreign policy of India towards Central Asia Enhancing cooperation for ...
Chitra Rajora, Delhi, India ||23

05) Physiological Study of Dominant Hand Grip Strength with Selected ...
Dr. Sheeldhar Dubey, Lucknow ||34

06) Role of National Scheduled Tribes Finance and Development Corporation ...
Ghukse Amol Bhikaji, Aurangabad ||37

07) The Tradition of Feminist Writings in India and Indira Goswami as a Novelist
Dr. Laxman Jogdand & Monika Gogoi, Nanded (Maharashtra) ||43

08) Effect of Pragya yoga and Pranakarshana Pranayama on Hemoglobin, ...
Dr. Bhanu Prakash Joshi, Nainital, Uttarakhand ||51

09) A STUDY ON CUSTOMER'S AWARENESS ON GREEN BANKING INITIATIVES IN ...
Dr. Manish Kumar, Lucknow, India ||54

10) Online Teaching and Learning: Be Boon or Bane A study of A &N Islands
Dr. R V R Murthy, Port Blair ||58

11) IMPACT OF E-EDUCATION
S. Y. Patil, Nanded ||61

12) A Study on socio-Economic conditions of women workers in building ...
S.Prabhavathi & Dr C.A.Paari, Erode ||70

13) A study of impact of goods and services tax on customer stimuli and cost ...
Prity Kumari, Begusarai ||75

www.vidyawarta.com/03 - http://www.printingarea.blogspot.com



136

ISSN: 2394 5303 | Impact Factor 7.387(IIJIF) | Printing Area® Peer-Reviewed International Journal | January 2021 Issue-72, Vol-01 | 011


14) Impact of Covid-19 (Corona virus) Pandemic Situation on the Role of ... ||78
**Mrs. Rakte Jyoti Bhausaheb, Dist. Beed**

15) Quest of the Self in Vilas Sarang's The Dhamma Man ||87
**Shah Himanshu, Godhra, Gujarat**

16) Role of Economic Environment and Entrepreneurship ||91
**Dr.Songirkar Nitin Bhatu, Nashik (Maharashtra)**

17) Comparative Preliminary Phytochemical Analysis of Cassia tora Linn: ... ||95
**Santosh Kumar Tambrey & Neelima Pandey, Korba (C.G.)**

18) Perception of Teacher Educators on Organizational Climate of District ... ||99
**Dr. C.S. Vazalwar & Varsha Shashi Nath, Bilaspur, C.G., India**

19) A Geographical study of Population growth and trends in Solapur city ||104
**Dr. H.D.Wagalgave, Dist.Nanded**

20) संताचे साहित्य व पर्यावरण ||107
**प्रा. प्रतिभा कृष्णराव आवंडकार (थोरात), अंजनगाव सुर्जी**

21) सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेकरीता लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण व ... ||110
**डॉ. प्रदीप रा. भानसे, जि. गोंदिया**

22) स्त्री संरक्षणात महिला आयोगाची भूमिका ||119
**प्रा.डॉ. मीना भगवानराव बोर्डे, जालना**

23) भारतीय संविधान आणि मानवाधिकार ||121
**प्रा.डॉ.चौधरी कालीदास पंढरीनाथ, गेवराई**

24) बौध्दिक संपदा हक्क आणि ग्रंथालये ||124
**प्रा.डॉ.गव्हाणे एम.पी., जि.बीड**

25) ल. सी. जाधव यांच्या कवितेचे स्वरूप व मूल्यमापन ||126
**मिनाक्षी गोणारकर, पुणे**

26) साठोत्तरी साहित्यप्रवाचा 'स्त्री' कडे पाहण्याचा दृष्टिकोन ||129
**प्रा.कांबळे डी.आर., सोनखेड**

27) शास्त्रीय संगीताच्या उत्कर्षाकरीता संगीत शिक्षकाला कोणकोणत्या समस्यांना सानोरे जावे लागते ||132
**डॉ.जयश्री विश्राम कुळकर्णी, जि.अमरावती**


www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

28) महात्मा गांधी आणि ग्रामस्वराज्य
**डॉ.लोखंडे बी.बी., जि.बीड** ||133

29) राजर्षी शाहु महाराज यांचे शैक्षणिक विचार : एक चिकित्सक अभ्यास
**अविनाश सु. पाईकराव, नदिड** ||136

30) भारतीय स्वातंत्र्य चळवळ आणि आर्य समाज
**दीपिका पाटील, डॉ. नंदिनी तडकलकर & डॉ. नवनाथ अडकिणे** ||139

31) गोरबंजारा समाजातील संघटना : भुमिका व कार्यपद्वती
**डॉ.साहेब गुलाबराव राठोड, जि. परभणी** ||141

32) भारत आणि इस्त्राईलमधील सहकारी शेती : तुलनात्मक अभ्यास
**प्रा. डॉ. टी.जी. सिराळ, जि. हिंगोली** ||144

33) सत्य और अहिंसा : अचुक अस्त्र— म.गांधीजीके विचार एवं भुमिका
**डॉ.रजनी डब्ल्यु.वाढई, गडचिरोली** ||147

34) रामधारी सिंह दिवाकर के उपन्यासों में युगबोध
**नन्दनी कुमारी, दरभंगा, बिहार** ||152

35) भारतीय राजनीति में दलित नेता कांशीराम की भूमिका
**डॉ. कपिल खरे, जिला —इंदौर (म.प्र.)** ||158

36) प्रेमचंद की कहानियों में दलित विमर्श
**डॉ. संजय गड़पायले, जि. परभणी** ||163

37) गांधी चिन्तन में सत्याग्रह एवं उसकी वर्तमान में प्रासंगिकता
**डॉ. राजेन्द्र सिंह गुर्जर, दौसा** ||167

38) १९वी एवं २०वी सदी में सहारनपुर में समाज एवं धर्म सुधार
**ललित कुमार, सहारनपुर** ||174

39) अंगिका के जनक अंग कोकिल डॉ. परमानन्द पाण्डेय का ऐतिहासिक एवम् ...
**डॉ. प्रीति पाण्डेय, पटना** ||178

40) हिंदी उपन्यासों में चित्रित किन्नर प्रतिरोध
**Mariat Augustine, Ernamkulam** ||181

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



138

41) पंजाब प्रसिद्ध वाद्य–निर्माता स. गुरदयाल सिंह जी का व्यक्तित्व व कृतित्व
**सन्नी, चण्डीगढ़**
||183

42) रामचरितमानस के अनुसार शिक्षण विधियाँ
**डॉ. उषा दुवे, ग्वालियर**
||185

43) ब्रिटिश आर्थिक नीतियों का भारतीय अर्थव्यवस्था पर प्रभाव : एक अध्ययन
**डॉ. अजय शंकर यादव, झांसी, उ.प्र.**
||188

44) भारतीय राष्ट्रीय एकीकरण : नये आयाम
**डॉ. किशन यादव, झाँसी**
||191

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

शिफारस आयोगामार्फत शासनाला करावी.

४ गुन्हेगारांना शिक्षा व कठोर कार्यवाहीसाठी आयोगाने कठोर पावले उचलणे आवश्यक आहे.

संदर्भ:—

१ प्रतिभा रानडे.स्त्रीप्रश्नांची चर्चा १९ वे शतक, प्रगती प्रकाशन पुणे.

२ धनागरे द.ना.संकल्पनाचे विश्व आणि सामाजिक वास्तव, प्रतिमा प्रकाशन.

३ प्रदीप आगलावे.संशोधनपध्दती.

४ सुलभा तेरणीकर डायमंड सामाजिक ज्ञानकोशखंड, पुणे.

५ महिला आयोग व राष्टीय महिला आयोग गुगलवरुन माहिती संकलित केली आहे.

□□□

23

# भारतीय संविधान आणि मानवाधिकार

प्रा.डॉ.चौधरी कालीदास पंढरीनाथ
राज्यशास्त्र,
महिला महाविद्यालय, गेवराई

**प्रस्तावना :**

भारत स्वातंत्र्यपूर्वीपासून संयुक्त राष्ट्र संघटनेचा सदस्य होता.वैश्विक मानवाधिकार घोषणापत्राच्या निर्मितीतही भारताचा सहभाग होता. त्यामुळे या घोषणापत्राचा प्रभाव भारतीय राज्य घटनेवर पडणे अत्यंत स्वाभाविक होते.

अर्थात मानवी अधिकारांसाठी भारतात फार पूर्वी पासून अनेक विचारवंतांनी आपली मते मांडली आहेत. त्यासाठी संघर्ष केला आहे. मानवी अधिकारांशिवाय लोकशाहीला आणि स्वातंत्र्यालाही काही अर्थ उरणार नाही, हे अनेक भारतीय नेत्यांचे मत होतेच. त्यामुळे भारतीय राज्यघटना तयार करताना मानवी अधिकारांचा सखोक विचार झालेला आहे.

घटना निर्मितीसाठी ज्या अनेक समित्या तयार करण्यात आल्या, त्यातच एक नागरिकांच्या मूलभूत हक्कांसाठीची महत्वाची समितीही तयार करण्यात आली होती. यावरुन घटना समितीने मानवी मूलभूत हक्कांना म्हणजेच मानवाधिकाराला अनन्यसाधारण महत्व दिले होते, हे लक्षात येते.

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय घटना समितीने अंगीकृत केलेल्या राज्यघटनेच्या प्रास्ताविकातच जो निर्धार व्यक्त केला आहे तोच मुळी मानवाधिकारांच्या संरक्षणाची हमी देणारा असा निर्धार आहे. त्याशिवाय संविधानाचे उद्दिष्टही नमूद केले आहे.

भारतीय राज्यघटना लागू झाल्यानंतर (१९५०) मानवाधिकार घोषणापत्रातील अधिकांश अधिकार भारतीय राज्यघटनेत दोन ठिकाणी नोंदवण्यात आले आहेत.

१) मूलभूत हक्क २) राज्यांसाठी मार्गदर्शक तत्वे.

राज्यघटनेतील कलम १२ ते ३५ मधील मूलभूत हक्कांत नागरिकांना

१) समतेचा अधिकार

२) स्वातंत्र्याचा अधिकार



१५०

३) शोषणाविरुध्द न्यायाचा अधिकार

४) धार्मिक-सांस्कृतिक व शैक्षणिक स्वातंत्र्याचा अधिकार

५) मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार

६) घटनात्मक उपाय योजनांचा अधिकार हे अधिकार देण्यात आले आहेत तर,

**राज्यघटनेतील राज्यांसाठी मार्गदर्शक तत्वांत -**

१) सामाजिक सुरक्षिततेचा अधिकार

२) काम करण्याचा अधिकार

३) रोजगार निवडण्याचा अधिकार

४) कामाच्यचा ठिकाणी सुरक्षित व सुविधाजनक वातावरणाचा अधिकार

५) समान कामासाठी समान वेतनाचा अधिकार

६) मानवीय प्रतिष्ठा मिळविण्याचा अधिकार

७) आराम,सुटीचा अधिकार

८) सांस्कृतिक कार्यक्रमांत सहभागी होण्याचा अधिकार

९) सर्वांना समान न्यायाचा अधिकार, मोफत कायदेशीर सल्ला मिळण्याचा अधिकार

या अधिकारांचा समावेश करण्यात आला आहे. भारतीय राज्यघटनेतील भाग तीनमध्ये कलम १२ ते ३५ नुसार नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार भारतीय नागरिकांना मिळालेले मूलभूत हक्क खालील प्रमाणे -

**१) समानतेचा हक्क -**

* प्रत्येक भारतीय नागरिक कायद्यापुढे समान असेल.

* प्रत्येक भारतीय नागरिकास कायद्यापुढे सारखेच संरक्षण असेल.

* धर्म-वंश-जात-लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरुन कोणत्याही नागरिकांत भेदभाव केला जाणार नाही.

* सार्वजनिक, शासकिय नोकऱ्यांत सर्वांना समान संधी असेल.

* **कायद्याने अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे.** अस्पृश्यता पाळणे कायद्याने दंडनीय अपराध असेल.

* शासनाकडुन कोणालाही खास दर्जा व किताब दिला जाणार नाही. (सेवा व विद्याविषयक वगळून)

**२) स्वातंत्र्याचा हक्क -**

भारतीय राज्यघटना प्रत्येक भारतीय नागरिकास

१) भाषण व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य

२) शांततेने विनाशस्त्र एकत्र जमण्याचे ,सभा घेण्याचे स्वातंत्र्य

३) पक्ष, संस्था,संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य

४) भारतात सर्वत्र कुठेही स्थायिक होऊन राहण्याचे स्वातंत्र्य

५) भारतात सर्वत्र मुक्त संचार करण्याचे स्वातंत्र्य

६) भारतीय नागरिकास व्यापार, उद्योग,धंदा,व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य इत्यादी स्वातंत्र्ये बहाल करीत आहे.

**३) शोषणाविरुध्दचा हक्क -**

भारतीय नागरिकांना शोषणाविरुध्द हक्क बहाल करताना भारतीय राज्यघटनेने

१) माणसांचा व्यापार,देहविक्री,वेठबिगारी यांना मनाई केली आहे.

२) १४ वर्षाखालील बालकांना कारखान्यांत,खाणीत अथवा कोणत्याही धोकादायक कामावर ठेवता येणार नाही.

**४) धर्म स्वातंत्र्याचा हक्क -**

* धर्माचे मुक्त प्रकटीकरण,

* धार्मिक आचरण

* धर्माचा प्रचार- प्रसार करणे

* धर्मविषयक व्यवहाराची व्यवस्था पाहण्याचे स्वातंत्र्य

* धर्मसंवधर्नासाठी दान देण्याचे स्वातंत्र्य

* धार्मिक शिक्षण, धार्मिक उपासना यांना उपस्थित राहण्याचे स्वातंत्र्य.

**५) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क -**

* अल्पसंख्याक वर्गाच्या हितसंबंधाचे संरक्षण.

* अल्पसंख्याक वर्गांना शिक्षण संस्था चालविण्याचा हक्क

**६) संविधानिक उपाय योजनांचा हक्क -**

सर्वोच्च किंवा उच्च न्यायालये - भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२ अन्वये मूलभूत अधिकारांच्या भंगाबद्दलची तक्रार सर्वोच्च न्यायालयाकडे करता येते. एकूण पाच प्रकारचे न्यायलेख / विशेष आदेश (रिटस) सर्वोच्च न्यायालय जारी करु शकते. उच्च न्यायालयही हेच पाच न्यायलेख / विशेष आदेश-कलम २२६ नुसार जारी करु शकते.

**पाच विशेष आदेश**

**१) बंदी प्रत्यक्षीकरण -(Habeas corpus)**

सरकारी अधिका-याने किंवा कोणत्याही व्यक्तीने इतर कोणत्याही व्यक्तीस बेकायदेशीररित्या डांबून ठेवले आहे, अशी तक्रार त्या व्यक्तीच्या वतीने सर्वोच्च अगर उच्च न्यायालयाकडे अर्ज करुन केल्यास, न्यायालयअशा बंदिस्तास आपल्यासमोर हजर करावे, असा आदेश देते व ही बंदी बेकायदेशीर आहे असे चौकशीत आढळल्यास त्याचा मुक्ततेचा आदेश देते.

२.परमादेश न्यायलेख - (Mandamus)

सार्वजनिक सेवेतील अधिकारी आपले कर्तव्य करीत नसेल व त्यामुळे एखाद्या नागरिकास त्याला मिळावयाचा अधिकार किंवा सेवा मिळत नसेल तर अशा वेळी सार्वजनिक सेवेतील अधिकाऱ्यास आपले कर्तव्य पार पाडण्याचा आदेश न्यायालय देऊ शकते.

३. प्रतिवेध न्यायलेख - (Prohibition)

एखादया कनिष्ठ न्यायालयासमोर,न्यायाधिकरणासमोर किंवा चौकशी अधिका-यासमोर एखाद्या प्रकरणाची सुनावणी सुरु असेल, अशी सुनावणी ऐकण्याचा त्या न्यायालयास, न्यायाधिकरणास वा चौकशी अधिकाऱ्यास अधिकार नसेल किंवा अन्य संयुक्तीक कारणाने ही सुनावणी तेथे होणे योग्य नसेल तर पुढील चौकशीस बंदी करावी, असा आदेश सर्वोच्च किंवा उच्च न्यायालय देऊ शकते.

४.अधिकार पृच्छा न्यायलेख - (Quo-Warranto)

एखादी व्यक्ती कोणत्याही शासकिय पदावर किंवा लोकसेवक म्हणून काम करीत असेल, परंतु हे पद धारण करण्याचा त्या व्यक्तीस अधिकार नसेल, तर व्यक्तिची निवड अगर नेमणूक कायदेशीर नसेल तर या पदावर काम करण्याचा तुम्हाला काय अधिकार आहे ? अशी विचारणा करणारा आदेश सर्वोच्च व उच्च न्यायालयास देता येतो.

५. उत्प्रेषण न्यायलेख (Certiorari)

निष्ठ न्यायालयाने, न्यायधिकरणाने एखाद्या प्रकरणात दिलेला निकाल जर त्याच्या अधिकार कक्षेच्या बाहेर असेल किंवा हा निकाल नैसर्गिक न्यायतत्वाचा भंग करुन दिला असेल तर अशा निर्णयाचे पुर्नविलोकन करुन तो निकाल फिरवण्याचा किंवा दुरुस्त करण्याचा उच्च न्यायालयास अधिकार आहे.

सर्वोच्च व उच्च न्यायालयासमोर येणाऱ्या खटल्यांत मानवाधिकारांचेही प्रश्न गुंतलेले असतात.

* पोलीसांच्या ताब्यात असतांना बेपत्ता झालेल्या व्यक्तीचे प्रकरण

* पोलीसांनी विनाकारण डांबून ठेवलेल्या व्यक्तीचे प्रकरण

* खटले सुनावणीस न निघाल्याने वर्षानुवर्षे तुरुंगात खितपत पडलेल्या व्यक्तीची प्रकरणे.

* निरपराध लोकांचा चौकशीसाठी विनाकारण करण्यात आलेल्या छळांची प्रकरणे.

* मजूर-स्त्रिया-बालगुन्हेगारांच्या शोषणाची प्रकरणे.

* वेतनाच्या बाबतीत स्त्रियांना दिली जाणारी असमानतेची प्रकरणे

* सार्वजनिक आरोग्याची हेळसांड करणारी प्रकरणे.

* उपजीविकेचे साधन अचानक हिरावून घेणाऱ्या शासकिय निर्णयाची प्रकरणे.

* शहरांत वाढणारे प्रदूषण व त्यामुळे जीवनाला आवश्यक असणाऱ्या शुध्द हवेचा अभाव असणारी प्रकरणे.

* अविचाराने केलेली जंगलतोड व यामुळे आदिवासींचे उद्ध्वस्त होणारे जीवन या संबंधीची प्रकरणे.

अशा अनेक प्रकरणांत सर्वोच्च व उच्च न्यायालयांनी लक्ष घातले व मानवाधिकारांचे रक्षण केले आहे. यावरुन मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या या पाचही न्यायलेख जारी करण्याच्या अधिकारांचा उपयोग होतो, हे यापूर्वी अनेकदा सिध्द झाले आहे.

फौजदारी कायद्याखाली गुन्हा असेल तेथे तर मानवाधिकार भंग होण्याचे प्रकरण असेल तर कनिष्ठ न्यायालयेही गुन्हेगारास शिक्षा करु शकतात.

मानवाधिकाराच्या भंगाबाबत दाद मागता येणा-या न्यायालय या व्यासपीठाची आपण माहिती घेतली. असेच दुसरे व्यासपीठ म्हणजे १९९३ मध्ये भारतीय संसदेने संमत केलेल्या मानवाधिकार संरक्षण कायद्यांतर्गत स्थापन करण्यात आलेले राष्ट्रीय मानवाधिकार आयोग व राज्य मानवाधिकार आयोग या व्यासपीठांबद्दल आपणास सविस्तरपणे राष्ट्रीय मानवाधिकार आयोग या प्रकरणात वाचावयास मिळेल.

**संदर्भ ग्रंथ :**


१) भारतीय संविधान

२) भारतीय शासन राजकारण

३) राज्य मानव अधिकार आयोग

४) राष्ट्रीय मानव अधिकार आयोग

५) मानव अधिकार

६) आंतरराष्ट्रीय मानव अधिकार.


❑❑❑